# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र.१२०–२०१०/ दिनांक :

श्री. सुरेश सदाशिव खराडे,
गट क्र. ४६५/१, घर नं. १४१५६७/३,
संत मळा, इचलकरंजी – ४१६ ११५, जि. कोल्हापूर — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर — विरूध्द
पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
अ उप विभागीय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सुरेश सदाशिव खराडे, संत मळा, इचलकरंजी यांनी अनुसूचि अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द मंचाकडे दि. ७.६.२०१० रोजी तक्रार दाखल केली. अनुसूचि अ सोबत जोडलेल्या लेखी पत्रानुसार तक्रारदार यांनी गट क्र. ४६५/१, संत मळा, इचलकरंजी येथे २७ एच.पी. लाईन साठी दि. ८.६.२००५ ला अर्ज केला. त्यांचा अर्ज क्र. ७० आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार त्यांची प्रमुख तक्रार त्यांना दि. ८.६.२००५ पासून आज अखेर वि.प.ने ग्राहकाने खर्च करावयाचे चलन दिले नाही, म्हणून दि. २०.४.२०१० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे क्ष फॉर्ममध्ये तक्रार नोंदविली. अंतर्गत कक्षाने दि. १.६.२०१० रोजी आदेश पारित करुन तक्रारदाराने मागणी केली भरपाई देण्यात आली नाही. तक्रारदाराने सर्व कागदपत्रे सादर करावीत त्यानंतर वितरण कंपनीने वीज कनेक्शन द्यावे असे आदेश दिले. त्याच्या नाराजीने प्रस्तुतचे अपील मंचासमोर दाखल केले. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार अंतर्गत कक्षाने भरपाई देण्याचे नाकारले आहे हे त्यास मान्य नाही. तक्रारदाराने दि. ८.६.२००५ पासून न्याय निर्णय होईपर्यंत ग्राहकाने खर्च करावयाचे चलन वि.प.ने न दिल्यास विलंबाबाबत नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली व अंतर्गत कक्षाच्या अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करावी त्यांनी राज्य आयोगाच्या आदेशाचे पालन केले नाही. विना विलंब वीज जोडणी द्यावी.

वितरण कंपनीने आपल्या दि २४.६.२०१० च्या लेखी अहवालात जो नोडल ऑफीसर मार्फत दाखल केला आहे त्यामध्ये तक्रारदार यांचा २७ एचपीचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला व त्या अनुषंगाने संबंधित तक्रारदार यांचे जागेचे निरीक्षण केले असता सदर जागेवर बांधकामास सदरचा भार ज्या रोहित्रावर द्यावयाचा होता त्या रोहित्रावर भार शिल्लक नसलेमुळे वीज कनेक्शन मंजूर करता येत नसलेबद्दल तक्रारदार यांना दि. २०.६.२००५ च्या नोटीसीद्वारे कळविणेत आले आहे. तसेच ग्राहक स्वत: रोहित्र व इतर काम करणेस तयार आहेत किंवा कसे याबद्दलसुध्दा लेखी कळविणेबाबत या नोटीसीद्वारे त्यांना कळविणेत आले होते. परंतु तक्रारदार यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही व कोणतीही पूर्तता केली नाही त्यामुळे त्यांचा अर्ज प्रलंबित आहे यामुळे तक्रारदार यांनी मागणी केलेली नुकसान भरपाईची मागणी मान्य करु नये असे म्हणणे मांडले. वि.प.चे उप कार्यकारी अभियंता, अ उप विभाग, इचलकरंजी यांनी दि. २८.६.२०१० च्या लेखी अहवालात अर्जदाराने मागणी केलेला जोडभार (२७ एचपी) हा अस्तित्वात असलेल्या वितरण मेन्सवरुन देणे अशक्य असलेचे कनिष्ठ अभियंता शाखा पश्चिम यांना आढळून आले. त्यानुसार त्यांनी अर्जदारास दि. २०.६.२००५ रोजी कळविले आहे असे म्हटले आहे. तसेच अर्जदारास दि. २०.६.२००५ ला दिलेल्या पत्रात सदर कनेक्शन जोडणी करणेसाठी ६३ केव्हीए ट्रान्स्फॉर्मरची उभारणी करणे आवश्यक असलेबाबत व अर्जदार स्वत: उभारणी करणार अथवा कसे ? या बाबत विचारणा करणेत आली आहे, तथापि अर्जदाराने या बाबत कोणताही पत्र–व्यवहार केलेला नाही. कनिष्ठ अभियंता, पश्चिम यांनी प्रत्यक्ष केलेल्या सर्वेक्षणावेळी अर्जदाराने कारखान्यासाठी लागणाऱ्या शेडची उभारणी केली नव्हती तसेच दि. २६.४.२०१० ला प्रत्यक्ष पाहणी केली असता, अद्यापही कारखान्याच्या शेड उभारणीचे काम पूर्ण झालेले नव्हते. त्यामुळे कनेक्शन जोडणी न केलेने अर्जदाराचे नुकसान होत असलेबाबतचे म्हणणे पूर्णत: चुकीचे आहे. तक्रारदाराने अर्ज करुन ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असलेने अर्जारास नवीन अर्ज सादर करणे बाबत आदेश द्यावेत अशी विनंती केली आहे. लेखी अहवालासोबत दि. २०.६.२००५ ची नोटीसीची प्रत जोडली आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २८.६.२०१० रोजी सुनावणीस घेण्यात आली. तक्रारदार स्वत: हजर. तक्रारदार यांनी सन २००५ मध्ये अर्ज दिला आहे आणि ट्रान्स्फॉर्मरची आवश्यकता आहे असे सन २०१० मध्ये वि.प.म्हणते तक्रारदार यांनी श्री. करंदीकर वकिलांमार्फत लिगल नोटीस दि. २२.३.२०१० ला दिली आहे असे मंचासमोर तोंडी सांगितले. तक्रारदाराचे म्हणणे की कागदपत्रांची पूर्तता केली नाही म्हणजे काय ? केवळ काम प्रलंबित ठेवून त्रास देण्याचा वि.प.चा उद्देश आहे.

वि.प.तर्फे श्री. राठी, उप कार्यकारी अभियंता यांनी मंचासमोर असे प्रतिपादन केले की, तक्रारदार यांस पत्राने कळवूनही त्यांनी कुठल्याही प्रकारे प्रतिसाद दिला नाही. दि. २६.४.२०१० ला प्रत्यक्ष पाहणी केली असता बांधकाम पूर्ण नसल्याने शेड उभारणीचे काम पूर्ण झालेले नव्हते. पायाभूत सुविधा (इन्फ्रास्टक्चर) उभारणी झाल्यावर त्वरीत कनेक्शन देवू. श्री. खाडे, कनिष्ठ अभियंता यांनी सांगितले की,११०० व्होल्ट एल.टी. लाईन, एक्स्प्रेस फिडर सद्याच्या ग्राहकांसाठी असून नवीन ग्राहकांसाठी नाही, त्यामुळे तक्रारदाराची एक्स्प्रेस फिडरवरुन वीज पुरवठा देणेत यावा ही मागणी योग्य नाही.

वि.प.चे अधिकारी श्री. राठी यांनी नवीन स्कीममधून विद्युत पुरवठा देता येईल असे मंचासमोर सांगितले. तक्रारदाराने त्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे पूर्ण करुन देण्यास तयार आहे असे सांगितले. त्यानंतर दि. २८.७.२०१० ला श्री. राठी यांचेकडे विचारणा केली असतां, तक्रारदारास कोटेशन दिले आहे, ग्राहकाने पैंसे भरले आहेत, ट्रान्स्फॉर्मर कपॅसिटी वाढवून १५ दिवसांत कनेक्शन देतो असे सांगितले. दि. ११.८.२०१० ला श्री. राठी यांनी मंचाला फोनवरुन तक्रारदार यांना वीज कनेक्शन दि. २०.८.२०१० पर्यंत देत आहे असे सांगितले. १०० केव्हीएचा ट्रान्सफॉर्मर बसविला आहे. दि. ३१.८.२०१० वि.प. अधिकारी यांनी मंचाला अग्रेषित केलेले पत्र हजर केले. त्यामध्ये तक्रारदार यांना १९ एच.पी. व सौं. संजीवनी सुरेश खराडे यांना ९ एच.पी.चे कनेक्शन मिळणेसाठी नवीन अर्ज दि. ६.७.२०१० ला वि.प.च्या इचलकरंजी विभागाकडे सादर केला. त्यानंतर विभागीय कार्यालयाने अ उप विभाग, इचलकरंजी कार्यालयाकडे दि. ८.७.२०१० रोजी सर्व्हेक्षण करणेसाठी सदर अर्ज पाठविला. उप विभागाने सदर कनेक्शनसाठी उभारणी करावयास लागणारी लघुदाब वाहिनी ०१२ किमी व ट्रान्स्फॉर्मर क्षमता ६३ केव्हीए वरुन १०० केव्हीए करणेसाठीचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी विभागीय कार्यालयाकडे पाठविले. दि. २०.७.२०१० रोजी तक्रारदार यांच्या दोन्ही कनेक्शन्सना मंजुरी देणेत आली व पैंसे भरणेसाठी दि. २२.७.२०१० ला कोटेशन देण्यात आले. तक्रारदार यांनी दि. २६.७.२०१० ला कोटेशनची रक्कम भरली. दि. १६.८.२०१० ला वि.प.ने १०० केव्हीएचा ट्रान्सफॉर्मर बसविला, तसेच कंत्राटदाराकडून लघुदाब वाहिनी उभारणीचे काम दि. २४.८.२०१० ला पूर्ण करणेत आले. तक्रारदार यांनी दि. २१.८.२०१० ला चाचणी अहवाल वि.प.च्या कार्यालयात सादर केला. वि.प.च्या विभागीय कार्यालयाकडून ५०/५ अँपीअरचे सी.टी. मीटर प्राप्त झाले. दि.२६.८.२०१० ला कनेक्शन जोडणीवेळी कांही त्रुटी आढळून आल्या. त्याची पूर्तता करुन दि.३०.८.२०१० रोजी वीज जोडणी देण्यात आली.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना दि. ८.६.२००५ पासून चलन मिळणेपर्यंतच्या कालावधीतील विलंबापोटी भरपाई देण्याचा आदेश वि.प.स देणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

<u>कारणमिमांसा</u>

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांनी दि. १.६.२०१० च्या आदेशामध्ये तक्रारदाराचे नुकसान भरपाई बाबत आदेश दिले नाहीत म्हणजे ते फेटाळण्यात आले आहेत असे म्हणता येईल. तक्रारदाराने कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर वि.प.ने त्यांना वीज कनेक्शन द्यावे असे आदेश दिले. त्या आदेशाच्या नाराजीने प्रस्तुतचे अपील मंचासमोर दाखल केले आहे.

तक्रारदाराच्या भरपाईच्या मागणीकडे वळण्यापूर्वी मंचासमोर व त्यानंतर घडलेल्या घटनांचा विचार करणे जरुर आहे. मंचासमोर तक्रारीच्या सुनावणीवेळी वि.प.चे अधिकारी श्री. राठी यांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर तक्रारदार यांना वीज जोडणी देता येईल असे सांगितले. तक्रारदार यांनी कागदपत्रांची पूर्तता करुन देण्याची तयारी दर्शविली. तक्रारदार यांना १९ एच.पी. व सौं. संजीवनी सुरेश खराडे यांना ९ एच.पी.चे कनेक्शन मिळणेसाठी नवीन अर्ज दि. ६.७.२०१० ला वि.प.कडे सादर केले. त्यांना २२.७.२०१० ला चलन देण्यात आले व वीज जोडणी दि. ३०.८.२०१० ला देण्यात आली. त्यामुळे तक्रारदाराची मागणी वीज जोडणी मिळावी वि.प.ने पूर्ण केली आहे, त्याचे वेगळे आदेश देण्याची जरुरी नाही. तक्रारदार यांनी विद्युत कायदा २००३ व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वितरण परवानेधारकाची कृतीची मानके (विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी व भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ मधील तरतुदींवर भर दिला आहे त्यानुसार –

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अस्तित्वात असलेल्या जाळ्यातून जोडणी द्यावयाची असल्यास | .. | एक महिना |
| २) | वितरण मेन्सचा विस्तार किंवा वाढ करावयाची आवश्यकता असल्यास | .. | तीन महिने |
| ३) | नवीन उप केंद्र सुरु करावयाची आवश्यकता असल्यास | .. | एक वर्ष |

वितरण कंपनीने या तरतुदींचा भंग केला आहे. थोडक्यात विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी व भरपाईचे निश्चितीकरण विनियम २००५ मधील कलम ४, ४.४, ४.५ व ४.६ प्रमाणे –

(4) <u>Period for giving supply :</u>

<u>4.1</u> The distribution licensee, shall, on an application by the owner or occupier of any premises, give supply of electricity to such premises, within one month after receipt of the application requiring such supply.

4.4 Where the supply to an aplicant is to be given from an existing net work of the distribution licensee, the distribution licensee shall intimate the charges to be borne by the applicant not later than fifteen days from the date of submission of such application for supply in towns and cities and within twenty days from the date of submission of such application for supply in rural areas, regardless of whether such application is deemed to be complete under Regulation 4.2.

4.5 Where the supply of electricity to a premises requires extension or augmentation of distributing mains, the distribution licensee shall give supply to such premises within three months from the date of receipt of complete application in accordance within the Maharashtra Electricity Regulatory Commission ( Electricity Supply Code and other Conditions of Supply) Reglations, 2005.

4.6 Where the supply of electricity to a premises requires commissioning of a new sub-station forming part of the distribution system, the distribution licensee shall give supply to such premises within one (1) year from the date of receipt of complete application in accordance with the Maharashtra Electricity Regulatory Commission ( Electricity Supply Code and other Conditions of Supply ) Regulations, 2005.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेनुसार कृती मानके विनियम हे दि. २०.१.२००५ पासून अंमलात आलेआहेत. तक्रारदाराचा विद्युत पुरवठा मिळणेबाबतचा अर्ज दि. ८.६.२००५ रोजीचा आहे. तक्रारदाराने उल्लेख केल्याप्रमाणे वि.प.च्या विनातारखेच्या पत्र–व्यवहाराची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. त्यामध्ये सद्यस्थितीत आपणांस मंजुरी देवून नवीन जोडणी करणेकामी विद्युत मंडळाकडे पायाभूत सुविधा उपलब्ध नसलेने या बाबत होणाऱ्या विलंबाबद्दल दिलगीरी व्यक्त केली आहे. तसेच आपल्या कामास तांत्रिक मंजुरी देण्यापूर्वी / तांत्रिक अहवाल मागविण्यापूर्वी आपणांस तशी सूचना करण्यात येईल असे नमूद केले आहे. त्यानंतर दि. २०.६.२००५ रोजी तक्रारदार यांना पाठविलेल्या नोटीसीमध्ये ट्रान्सफॉर्मरवर लोड शिल्लक नाही, नवीन ट्रान्सफॉर्मर सेंटर करणेसाठी जागा उपलब्ध नाही, या जागेवर आपलेकडून बांधकाम केलेले नाही, कागदपत्रे अपुरी आहेत, महाविरतणच्या अन्य योजनांमधून काम करुनघेणे बाबत संमत्ती पत्र सोबत जोडले नाही, नवीन ट्रान्सफॉर्मर सेंटरचे / लाईनचे काम पूर्ण झाले नाही, सदर ठिकाणी जवळ अस्तित्वात असलेल्या ट्रान्सफॉर्मरवरती लोड शिल्लक नसल्याने ६३ केव्हीएचा ट्रान्सफॉर्मर करावा लागेल. सदर काम आपण स्वत: करणार किंवा कसे या बाबत या कार्यालयास लेखी कळवावे, अन्यथा आपला अर्ज दफ्तरी दाखल केला जाईल असे नमूद केले आहे. तक्रारदार यांनी या पत्रास कुठल्याही प्रकारचे उत्तर दिले नाही. जवळजवळ ५ वर्षानंतर प्रथम अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे क्ष फॉर्ममध्ये दि. २०.४.२०१० ला अर्ज केला आहे.

उभयबाजूंनी मंचासमोर दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन हे स्पष्ट होते की, तक्रारदार यांनी पॉवरलूमसाठी २७ एच.पी. लोडची मागणी केलेली आहे आणि त्याचे सर्व्हेक्षणाचे आदेश देण्यात आले होते. कनिष्ठ अभियंता, पश्चिम यांनी प्रत्यक्ष केलेल्या सर्वेक्षणावेळी अर्जदाराने कारखान्यासाठी लागणाऱ्या शेडची उभारणी केली नव्हती तसेच दि. २६.४.२०१० ला प्रत्यक्ष पाहणी केली असता, अद्यापही कारखान्याच्या शेड उभारणीचे काम पूर्ण झालेले नव्हते. या ठिकाणी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग( विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम २००५ नुसार Application for supply 4. 3 (iv) नुसार तक्रारदार यांस वि.प.ने अर्जाबद्दल माहिती देणे आवश्यक आहे.

Inform an applicant, upon request, of the status of his application and the reasons, if any, for non-disposal of the application.

या ठिकाणी दि. २०.६.२००५ रोजी तक्रारदार यांना पाठविलेल्या नोटीसीमध्ये ट्रान्सफॉर्मरवर लोड शिल्लक नाही, नवीन ट्रान्सफॉर्मर सेंटर करणेसाठी जागा उपलब्ध नाही, या जागेवर आपलेकडून बांधकाम केलेले नाही, कागदपत्रे अपुरी आहेत, महाविरतणच्या अन्य योजनांमधून काम करुन घेणे बाबत संमत्ती पत्र सोबत जोडले नाही, नवीन ट्रान्सफॉर्मर सेंटरचे / लाईनचे काम पूर्ण झाले नाही, सदर ठिकाणी जवळ अस्तित्वात असलेल्या ट्रान्सफॉर्मरवरती लोड शिल्लक नसल्याने ६३ केव्हीएचा ट्रान्सफॉर्मर उभा करावा लागेल सदर काम स्वत: करणार का कसे ते कळवावे असे लिहीले.

अधिनियम ५.२ (बी) नुसार जागेची तपासणी केली असतां, पॉवरलूमसाठी आवश्यक असलेले शेडची उभारणी केलेली नव्हती. तसेच दि. २६.४.२०१० च्या वि.प.च्या अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष पाहणीचेवेळी हीच परिस्थिती होती. त्यामुळे वि.प.ला कृती मानके विनियमातील तरतुदींचे पालन करण्यात अपयश आले / कृती मानकाचा भंग केला आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे एस.ओ.पी. सोबत दिलेल्या शेड्यूल प्रमाणे भरपाईचे आदेश वि.प.स देण्याचा प्रश्नच येत नाही. तक्रारदार यांस वि.प.ने दि. २०.६.२००५ चे पत्रात ट्रान्सफॉर्मरवर लोड शिल्लक नाही, ६३ केव्हीएचा ट्रान्सफॉर्मर उभा करावा लागेल, त्यामुळे अन्य योजनांमधून काम करुन घेणे बाबत तक्रारदार यांस पर्याय सूचविला होता. तसेच या कामासाठी तक्रारदार स्वत: खर्च करण्यास तयार आहे का ? अशी विचारणा केली असतां, तक्रारदार यांनी त्यास कुठल्याही प्रकारे प्रतिसाद दिला नाही. वि.प.च्या सदर पत्रात वरील बाबींची पूर्तता होईपर्यंत तक्रारदाराचा अर्ज मंजुरीसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविता येणार नाही याची नोंद घ्यावी असे म्हटले आहे. त्यामुळे तक्रारदाराची वि.प.कडून भरपाई मागणेस कारण निर्माण झाल` नाही असे म्हणता येईल. त्यामुळे तक्रारदाराची भरपाईची मागणी फेटाळण्यात येत आहे. अंतर्गत कक्षाने तक्रारदाराची भरपाईची मागणी योग्य नाही असे म्हटले आहे परंतु ती न देण्याचे किंवा फेटाळण्याचे कारण दिले नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर नाही असे देण्यात येत आहे.

वरील विवेचनानुसार तक्रारदाराची एक मागणी वीज जोडणी मिळावी ही वि.प.ने पूर्ण केली आहे, तसा अहवालही मंचाकडे संबंधित अधिकाऱ्यांनी दिला आहे. तक्रार अंशत: मंजूर करण्यात आली आहे, तक्रारदाराची भरपाईची मागणी फेटाळण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

मंचाकडे दि. ७.६.२०१० ला तक्रार दाखल करण्यात आली. दि. २८.६.२०१० ला सुनावणी झाल्यानंतर तक्रारदाराने कागदपत्रे पूर्ण करुन नवीन स्कीमखाली वीज जोडणी घेण्याची तयारी दर्शविली. दि.२८.६.२०१० ला आदेश न करता वि.प.ने ग्राहकास वीज जोडणीसाठी पूर्तता मंचासमोर कबूल केल्याप्रमाणे करावी म्हणून ३१.०८.२०१० ला रिपोर्ट मचात दाखल झाला. त्यामुळे २ महिन्यात तक्रार निकाली काढणे अशक्य झाले.

## <u>आदेश</u>

१) तक्रारदाराची तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदाराचे मागणीनुसार वि.प.ने त्यांस दि. ३०.८.२०१० रोजी वीज जोडणी दिली आहे. तक्रारदाराच्या एका मागणीचे निवारण झाले आहे.

३) तक्रारदाराची मागणी दि. ८.६.२००५ पासून खर्चाचे चलन न दिल्यामुळे भरपाई मिळावी ही मागणी फेटाळण्यात येत आहे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी. पानकर , सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष